# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## परिपत्रक

Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

जा.क्र./शि.वि.को./सी.डी.ओ.ई./२४ दि.०५/०२/२०२६

संदर्भ : – १. जा.क्र.शिवाजी वि./सी.डी.ओ.ई./०१ दि.०१.१२.२०२६
२. जा.क्र.शिवाजी वि./सी.डी.ओ.ई./१९७ दि.१५.११.२०२५

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम. एम.ए. (भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी,), एम.ए. (सामाजिक शास्त्रे : इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. या अभ्यासक्रमांसाठी आपल्या अभ्यासकेंद्रांमार्फत विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज सादर केलेले आहेत. आपल्या केंद्राच्या प्रवेशित विद्यार्थ्यानी प्रवेश व परीक्षा अर्जासोबत पात्रतेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे दि.१५/०१/२०२६ पर्यत सादर करणेबाबत व पात्रतेच्या सद्यस्थितीचा तपशील (कन्फर्म पात्रता व प्रोव्हीजनल पात्रता) बाबत उपरोक्त संदर्भानुसार कळविण्यात आले होते (सोबत संदर्भिय सूचना माहितीस्तव जोडली आहे) तथापि काही विद्यार्थ्यांनी याबाबतची कागदपत्रे (संस्थातर दाखला (टी.सी.)/स्थलांतर दाखला (एम.सी.), दुहेरी पदवी अर्ज व शुल्क) अद्यापि या केंद्राकडे सादर केलेली नाहीत **त्यामुळे जे विद्यार्थी पात्रतेसंदर्भातील कागदपत्रे सादर करणार नाही अशा विद्यार्थ्यांची पात्रता प्रोव्हीजनल असल्यामुळे त्यांचे निकाल परीक्षा विभागामार्फत राखीव ठेवण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील पात्रता संदर्भातील सद्यस्थिती तपशील विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार आपल्या केंद्रावरील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याच्या पात्रता ( कन्फर्म ) अंतिम करणेसाठी विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे या केंद्राकडे **दि.२८/०२/२०२६** पर्यंत सादर करणेबाबत तात्काळ अवगत करावे. तसेच आपल्याकडे विद्यार्थ्यांनी संस्थातर दाखला (T.C.) व स्थलांतर दाखला (M.C.) सादर केले असतील ते या केंद्राकडे तात्काळ पाठवावेत, जेणेकरून सदर विद्यार्थ्याची अंतिम पात्रता करणे सोयीचे होईल.

Bhinde
उपकुलसचिव

प्रति,
**सर्व केंद्रप्रमुख/केंद्रसंयोजक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण अभ्यास केंद्रे.**

प्रत : –
१) मा.संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
२) सहाय्यक कुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
३) कक्ष अधिकारी,
४) सर्व संबंधित समन्वयक, विभागीय समन्वयक व हंगामी सहाय्यक प्राध्यापक,
५) सर्व संबंधित प्रशासकीय सेवक

(याबाबत सर्व संबंधित घटकांनी आवश्यक तो पाठपुरावा करून सदरची पूर्तता होणेबाबत कार्यवाही करावी. )